## RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017).)"

**Office of the Director, Board of Examination and Evaluation**
**(Ph.D. Cell)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**


No. RTMNU/Ph.D. Cell./ 448 Dated : 12.12.2017

# आचार्य पदवीसाठी नोंदणीसंदर्भात संशोधन स्थळाकरिता परिपत्रक

**विषय: विषयनिहाय मान्यताप्राप्त संशोधन स्थळ आणि संशोधन स्थळात कार्यरत असलेल्या विषयनिहाय मार्गदर्शकाची माहिती पाठविण्याबाबत**

आचार्य पदवी प्रवेश परीक्षा माहे डिसेंबर–२०१७ मध्ये आयोजित करण्याचे विचाराधीन आहे. आचार्य पदवी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संशोधकांना ज्या विषयात आचार्य पदवी नोंदणी करावयाची आहे अश्या संशोधन स्थळात आवेदन करणे बंधनकारक असुन मार्गदर्शक संबधित संशोधन स्थळात कार्यरत असणे आवश्यक आहे. संशोधकांना मार्गदर्शक देण्याची कार्यवाही संबधित संशोधन स्थळामार्फत निर्देशातील तरतूदीनुसार संशोधन स्थळात Supervisor Allotment Committee गठीत करून संशोधन स्थळामार्फत मार्गदर्शक उपलब्ध करून द्यावयाचे आहे. मार्गदर्शक उपलब्ध करून दिल्यानंतर ज्या संशोधकांना मार्गदर्शक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे त्यांच्यासाठी Research Advisory Committee संशोधन स्थळ प्रमुखांना गठीत करावयाची आहे. संशोधन स्थळात रिक्त असलेल्या जागेवर जागा, त्या विषयाचे ज्या मार्गदर्शकाकडे जागा रिक्त असेल अश्या मार्गदर्शकांना संशोधकांना उपलब्ध करून दिल्यानंतर ज्यांनी सादर केलेल्या प्रस्ताव Research Advisory Committee मार्फत पाहणी करून त्यानंतर संशोधक ऑनलाईन आवेदन करतील व ऑनलाईन केलेल्या आवेदनाची हार्डकॉपीवर संशोधन स्थळ प्रमुख व मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेवून व आवश्यक प्रक्रिया पुर्ण करून आचार्य पदवी कक्षात ऑनलाईन आवेदनाची प्रत आवश्यक कागदपत्रासह सादर करतील.

करिता उपरोक्त कार्यवाही घ्यावयाची असल्यामुळे ज्या महाविद्यालयांना ज्या ज्या विषयासाठी संशोधन स्थळ म्हणून मान्यता प्राप्त झालेली आहे अश्या सर्व संशोधन स्थळ असलेल्या महाविद्यालयांनी ज्या विषयाकरिता मान्यता प्राप्त झालेली आहे, त्या विषयात रिक्त असलेल्या जागांची माहिती, त्या विषयाचे पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असलेल्या मार्गदर्शकाची माहिती खालील दिलेल्या प्रपत्रामध्ये भरून त्वरित nagpuruniversity.org संकेतस्थळावर Ph.D. Cell या उपसंकेतस्थळावर देवून त्याची एक प्रत आचार्य पदवी कक्षाकडे त्वरित पाठवावी. व संशोधन स्थळाच्या स्तरावर खालीलप्रमाणे कार्यवाही घ्यावी.

१) संबधित महाविद्यालयांना ज्या विषयात संशोधन स्थळ म्हणून मान्यता मिळालेली आहे त्या विषयाचे मार्गदर्शक संबधित महाविद्यालयात कार्यरत असणे आवश्यक असून ते पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.

२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिशानिर्देशानुसार प्राध्यापकांना–८, सहयोगी प्राध्यापकांना–६ आणि सहायक प्राध्यापकांना –०४ पेक्षा जास्त संशोधक विद्यार्थी घेता येणार नाही.

३) संशोधन स्थळामध्ये विषयनिहाय प्रवेशित विद्यार्थ्यांची व रिक्त जागांची माहिती महाविद्यालयांच्या सुचना फलकावर प्रकाशित करणे आवश्यक आहे.

४) विषयनिहाय पदव्युत्तर शिक्षक मान्यता असलेल्या मार्गदर्शकाची, त्यांच्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी व रिक्त जागांची माहिती महाविद्यालयांच्या सुचनाफलकावर प्रकाशित करणे आवश्यक आहे.

५) आचार्य नोंदणी प्रवेश परीक्षा पेट–१ आणि पेट–२ उत्तीर्ण विद्यार्थी तसेच निर्देशातील तरतूदीनुसार पेट परीक्षेपासून सुटप्राप्त विद्यार्थी संशोधनस्थळामध्ये संशोधन स्थळ प्रमुखांच्या नावे आवेदन करतील.